श्री. क. ... देव

४१५

**अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांचे जमातीचे दाखले तपासणे**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शुध्दिपत्र क्रमांक : एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ मे, २००१

GR2001052801

**वाचा :** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९/प.क्र.२/का.१०, दिनांक ९ सप्टेंबर, १९९९.
२) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०,दि. १३ एप्रिल,२०००
३) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दिनांक १५ मार्च, २००१.
४) शुध्दिपत्र, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी - १३९९/ प्र.क्र.२/ का.१०, दिनांक २ मे, २००१

**शुध्दिपत्र** :- प्रस्तावनेतील दिनांक १३.४.२००० च्या परिपत्रकातील परिच्छेद- १ मध्ये "शासकीय / निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, नगर पालिका, महानगरपालिका, बँका, शासकीय उपक्रम (उदा. एस.टी.महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ ) व राज्य शासन अंगीकृत संस्थांमध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्ती झालेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जातीचे दावे पडताळणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत" अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद खाली सुधारित केल्याप्रमाणे वाचावी-

"शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे ( Undertaking ), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळे, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह ), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह ), सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies ) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर अगोदरच नियुक्त झालेल्या आणि नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांचे जमातीचे प्रमाणपत्र संबंधित तपासणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत. वरील सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ज्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी त्यांच्या पदोन्नतीच्या टप्प्यापर्यंत झालेली नाही अशा सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shyamal

( श्यामला शुक्ला )
उप सचिव

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे सचिव.

मंत्री / राज्यमंत्री, (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर.
सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
सामान्य प्रशासन विभाग (१६-ब), मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८,क्वीन्स गार्डन, पुणे.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे ( १० प्रती )
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
कुल सचिव, मुंबई विद्यापीठ,मुंबई/पुणे विद्यापीठ,पुणे/नागपूर विद्यापीठ,नागपूर/अमरावती विद्यापीठ, अमरावती/डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद/शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर/ श्रीमती नाथीबाई दामोदरदास ठाकरसी महिला विद्यापीठ ,मुंबई/उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
आयुक्त,अनुसूचित जाती/जमाती,भारत सरकार, ५ वा माळा,लोकनायक भवन,नवी दिल्ली-११०००३.
उपसंचालक,अनुसूचित जाती/जमाती आयोग,भारत सरकार,चिपळूणकर भवन,शास्त्री मार्ग,नवीपेठ, पुणे-३०.
सचिव, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
अपर आयुक्त,आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर.
सर्व उपआयुक्त, राज्य निवडणूक आयोग.
उप संचालक तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे/ /नाशिक/ पुणे / औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
सह सचिव, विधी व न्याय विभाग, नागपूर / औरंगाबाद.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंबई.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व उपजिल्हाधिकारी.
सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल)
सर्व तहसिलदार.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/पुणे/कोल्हापूर/नागपूर/अमरावती/नाशिक/ औरंगाबाद.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई / शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई .
श्री.सुरेश कुलकर्णी, विशेष समुपदेशी, मधुवंश, औरंगपूरा, औरंगाबाद-१.
श्रीमती सुषमा देशपांडे, विशेष समुपदेशी, २४०/ अ-१,बजाज नगर, एन.आय.टी. ऑफीसजवळ, नागपूर-१०
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती. का.१०